## थोडक्यात...

### परभणी-हिंगोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी मतदान पथके रवाना जिल्हाधिकाऱ्यांनी दाखविली हिरवी झेंडी



**परभणी** - विधान परिषदेच्या परभणी-हिंगोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान होत असून, मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी मतदान साहित्य घेऊन आज संबंधित मतदान केंद्रांकडे रवाना झाले. यावेळी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी मतदान पथकांच्या वाहनांना हिरवी झेंडी दाखवून रवाना केले. निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक आणि सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासनाकडून आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे. मतदान केंद्रांवर आवश्यक साहित्य, मनुष्यबळ व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### कोटूंबीक जमीन वाटणीची मोजणी अवघ्या २०० रुपयात- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)

**बीड** - राज्यातिल शेतकऱ्यां साठी मुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सुचने नुसार महसूल विभागाने एक मोठा निर्णय जाहीर केला आहे कोटुंबीक वाटणी करणासाठी शेतजमीनीची मोजणी फक्त २०० रु . माफक फीस भरुन केली जाणार आहे राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या बाबतची घोषणा केली आहे नियमीत मोजणी ९० दिवसात तर तातडीची मोजणी ३० दिवसाच्या आत पूर्ण करणे ही भुमीअभिलेख विभागास बंधनकारक केले आहे ग्रामिण भागातील नियमीत स्वरुपाच्या शेतजमीन मोजणीसाठी दोन हेक्टर पर्यंत २००० रु शुल्क आकारले जाणार आहे तर शहरी भागातील जमीन मोजणी साठी एक हेक्टर साठी ३००० रु . शुल्क आकारले जाणार आहे जमीन मोजणी प्रक्रीयेतील गैरप्रकारास या मुळे मोठ्या प्रमाणात आळा बसणार आहे अल्प भुधारक शेतकरी वर्गासाठी ही बाब दिलासादायक ठरणार आहे

### आता ई -पीक पाहणी सहाय्यकाद्वारे




(प्रभाकर नाईकनवरे/दै.धर्मयोध्दा)

**माजलगाव**- येत्या १५ जुलैपासून केंद्र सरकारच्या एमएचडी सीएस या ॲपद्वारे सहाय्यक, , ई- पीक पाहणी आता कामकाजात अत्यंत सुलभरीत्या पार पाडण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने सहाय्यक पदाची भरती केली आहे. यंदाच्या खरीप हंगामापासून ई-पिक पाहणी केंद्र सरकारच्या आदेशाने स्थानिक महिला बचत गट सदस्याच्या मदतीने ई -पीक पाहणी नोंदणी घेतली जाईल. प्रत्यक्ष लागवड पाहणी करून लागवड केलेल्या पिकाचीच नोंद घेतली जाईल शेतकऱ्यांच्या नोंदणी करिता मोबाईल वरून ई-पीक पाहणी केल्याचा मेसेज येणार आहे . पहिले मोबाईल ॲपद्वारे ई-पिक पाहणी मर्यादा ५० मीटर इतकी होती, आता ती मर्यादा २० मीटर इतकी केली आहे. सुरुवातीला २०२२ पासून मोबाईल ॲपद्वारे प्रक्रिया सुरू झाले आहे परंतु या काळात बऱ्याचशा शेतकऱ्याकडे अँड्रॉईड फोन नसल्या कारणाने व फोनला रेंज नसल्या कारणाने अडचणी निर्माण होत होत्या परंतु आता केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयाने या अडचणी माध्यमातून ई- पिक पाहणे सहाय्यका मार्फत प्रत्यक्ष पारदर्शक पद्धतीने पार पडतील असे अंदाज आहेत

Dharmayoddha.com

# स्मार्ट मीटरची सक्ती बेकायदेशीर; महावितरणच्या मनमानीविरोधात हिंगोलीत जन-आंदोलनाचा इशारा!

## धुळे ग्राहक मंचाच्या ऐतिहासिक निकालाचा दाखला देत ऊर्जामंत्र्यांकडे तीव्र आक्षेप नोंदविला

(महेंद्र पुरी/ दै.धर्मयोध्दा)

**हिंगोली**- संपूर्ण महाराष्ट्र राज्यासह हिंगोली जिल्ह्यात महावितरणकडून वीज ग्राहकांना कोणतीही वैध कायदेशीर नोटीस न देता केवळ ४८ तासांची पूर्वसूचना देऊन किंवा थेट दबाव आणून सक्तीने स्मार्ट मीटर बसवण्याची जी मोहीम राबवली जात आहे, ती पूर्णतः बेकायदेशीर, नियमबाह्य आणि सामान्य जनतेची दिशाभूल करणारी आहे. या मनमानी कारभाराविरोधात हिंगोली जिल्ह्यातील जागरूक वीज ग्राहक आणि विविध संघटनांच्या वतीने मा. अधिक्षक अभियंता यांच्यामार्फत राज्याचे मा. ऊर्जामंत्री यांना एक जाहीर जन-निवेदन सादर करण्यात येत असून, ही सक्ती तात्काळ न थांबल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे सदरचे निवेदन महाराष्ट्र




राज्य विद्युत वितरण कंपनी हिंगोली मंडळाचे उपाधिक्ष श्री चव्हाण यांचे मार्फत पाठविण्यात आले आहे. या जन-निवेदनात महावितरणच्या कारभारावर खालीलप्रमाणे गंभीर कायदेशीर आक्षेप घेण्यात आले आहेत: सक्तीचा कोणताही कायदा नाही: केंद्र शासनाची अधिसूचना केवळ मार्गदर्शक तत्त्वे आहेत. कोणत्याही कायद्यात ग्राहकावर त्याची इच्छा नसताना स्मार्ट मीटर सक्तीने लादण्याचा अधिकार महावितरणला नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन: जनहित याचिका क्र. डब्लु पी ५५९१/२०२३ मध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले आहेत की, ग्राहकाच्या लेखी संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसवता येणार नाही. महावितरणची सद्यस्थितीतील कारवाई हा थेट न्यायालयाचा अवमान (Contempt of Court) आहे. धुळे ग्राहक मंचाचा ऐतिहासिक चपराक: महावितरणच्या मनमानीला चाप लावणारा एक महत्त्वपूर्ण निकाल नुकताच धुळे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाने दिला आहे. रुपेश मराठे यांच्या प्रकरणात विनासूचना आणि अंतिम रीडिंग न घेता स्मार्ट मीटर बसवल्याबद्दल मा. मंचाने महावितरणला दोषी ठरवून तक्रारदाराला ८,०००/- नुकसानभरपाई व खर्च देण्याचे आदेश दिले आहेत. यावरून ग्राहकाच्या संमतीशिवाय मीटर बदलणे हा छळ असल्याचे कायदेशीररीत्या सिद्ध झाले आहे. ४८ तासांची नोटीस नियमबाह्य: (विद्युत पुरवठा संहिता) २०२१ नुसार, मीटर बदलण्यापूर्वी किमान १५ दिवसांची लेखी पूर्वसूचना देणे बंधनकारक असताना, महावितरण केवळ व्हॉट्सॲप किंवा एसएमएस वर ४८ तासांची नाममात्र नोटीस देऊन ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करत आहे. आर्थिक भुर्दंड व गोपनीयतेचा भंग: नवीन स्मार्ट मीटर आणि प्रीपेड प्रणालीमुळे वीज बिलात अवाजवी वाढ होत असल्याच्या हजारो तक्रारी आहेत. तसेच, ग्राहकांच्या घरातील उपस्थितीचा डेटा गोळा करणे हा संविधानाच्या कलम २१ नुसार गोपनीयतेच्या अधिकाराचा भंग आहे. तीव्र आंदोलनाचा इशारा: "जुने डिजिटल मीटर सुस्थितीत आणि अचूक कार्यरत असताना ते बदलून महागडे स्मार्ट मीटर ग्राहकांच्या माथी मारणे म्हणजे ग्राहक संरक्षण कायदा २०१९ मधील (निवडीचा अधिकार) या मूलभूत हक्कावर गदा आणणे आहे," असे नागरिकांचे म्हणणे आहे. जर महावितरणने ही जबरदस्तीची मोहीम तात्काळ थांबवली नाही, तर हिंगोली जिल्ह्यातील जागरूक नागरिक व संघटना मिळून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग , ग्राहक मंच आणि संबंधित पोलीस ठाण्यात बेकायदेशीर अतिक्रमण व न्यायालयाच्या अवमानाची कायदेशीर तक्रार दाखल करतील. तसेच जनतेच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरून तीव्र लोकआंदोलन उभारले जाईल, ज्याची सर्वस्वी जबाबदारी महावितरण प्रशासनाची राहील, असा इशारा या जन-निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. नंदकिशोर तोष्णीवाल, अनिल नैनवाणी, शेख नईम, खलील बेलदार, प्रमोद मुंदडा, कैलाश शहाणे , मिलिंद उबाळे, शेख नोमान, हाजी शिकुर, रिजवान बेलदार, मुस्ताक बागवान , शेख बासीद, सतीश लोणकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे १९ व २० जून रोजी आयोजन



**परभणी** - मुलभुत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र. द्वारा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने शिकाऊ उमेदवारी मेळाव्याचे आयोजन दि. १९ व २० जून २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परभणी येथे केले आहे. या मेळाव्यामध्ये दि. १९ जून २०२६ रोजी टाटा स्ट्राईव्ह व बीएमएसतर्फे एन्ड्युरन्स कंपनी, छत्रपती संभाजीनगर व दि. २० जून रोजी आर्म्स प्लेसमेंट तर्फे व्हेरॉक व ड्युरो व्हॉल्व कंपनी, छत्रपती संभाजीनगर करीता शिकाऊ उमेदवारी भरती केली जाणार आहे. आस्थापनामध्ये भरती केलेल्या शिकाऊ उमेदवारांना रु.१०,००० ते १५,०००/- विद्यावेतन दिले जाणार आहे, तरी जिल्हयातील आय.टी. आय उतीर्ण झालेले व शेवटच्या वर्षात प्रशिक्षण घेत असलेल्या उमेदवारांनी तसेच इतर पात्र उमेदवारांनी मेळाव्यात हजर राहून संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुलभुत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्राचे सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार विकास आडे यांनी केले आहे.

# आगीत तीन बैल,गोठा,शेती उपयोगी साहित्य खाक

(प्रदीप सावले/दै.धर्मयोध्दा)

**मालेगाव** - तालुक्यातील डोंगरकिन्ही येथे १५ जून रोजी दुपारी अचानक लागलेल्या आगीत शेतकऱ्याच्या गोठ्याचे मोठे नुकसान झाले या दुर्घटनेत तीन बैलांचा होरपळून मृत्यू झाला असून एक बैल गंभीर जखमी झाला आहे तसेच शेतीउपयोगी साहित्य जळून खाक झाल्याने ६ लाख ३८ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज महसूल प्रशासनाने व्यक्त केला आहे मिळालेल्या माहितीनुसार डोंगरकिन्ही येथील गट क्रमांक ३२० मधील शेतकरी निळकंठ वामनराव देशमुख यांच्या गोठ्याला दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यामुळे अचानक आग लागली आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केल्याने गोठ्यातील तीन बैलांचा मृत्यू झाला तर एक बैल गंभीर जखमी झाला. या आगीत स्प्रिंकलर संच,ठिबक सिंचन संच,पेट्रोल पंप,अँगल,शेतीची विविध अवजारे,दहा ट्रॉली कुटार,७० टिन पत्रे तसेच दहा ट्रॉली शेणखत आदी शेतीउपयोगी साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझविण्याचे प्रयत्न केले मात्र,आगीची तीव्रता अधिक असल्याने मोठे नुकसान टाळता आले नाही दरम्यान,मालेगाव नगरपंचायतीच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले अग्निशमन दलाचे वाहन दुपारी २ वाजता घटनास्थळी पोहोचले आणि त्यानंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाच्या अधिकाऱ्यानी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला मंडळ अधिकारी इंगळे,बी. टी.जमादार,तलाठी महेश देशमुख,डॉ.कोल्हाळ,ग्रामविकास अधिकारी संतोष राठोड,तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष सेवाराम आडे,सुनील देशमुख आदी उपस्थित होते आग विझविण्यासाठी दत्तराव देशमुख,अनु देशमुख,गजानन गवई,सुनील देशमुख,प्रदीप गवई,किसन घाटेकर,बाळू देशमुख,आकाश देशमुख,प्रल्हाद देशमुख,प्रशासक वसंता आडे यांच्यासह ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले पीडित शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी,अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# श्री.संत नामदेव नगर (पूर्व) येथील श्री साई गणेश मंदिरात श्रीमद्, भागवत कथेचे आयोजन

(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)

**बीड** - श्री. संत नामदेव नगर येथील श्री गणेश साई मंदिर मध्ये श्रीमद्भागवत कथेचे आयोजन दिनांक,२२जून २०२६सोमवार ते२८जून२०२६शनिवार या सप्ताहामध्ये करण्यात आले असून ह.भ.प.कृष्णा महाराज नंदकुमार महाराज रामदासी यांच्या मधुर वाणीतून आपण कथामृत श्रवण करणार आहोत. तरी सर्व श्रोत्यांनी कथा श्रवणाचा लाभ घ्यावा असे,श्री रुक्मिणीकांत कृपा सांप्रदायिक वारकरी भजनी मंडळ आणि



श्री संत जनाबाई महिला भजनी मंडळ यांनी आवाहन केले आहे..दिनांक २२जून रोजी सोमवारी सकाळी ठीक साडे आठ वाजता शोभा यात्रा,कलश पूजन आणि श्रीमद् भागवत ग्रंथ मिरवणुकीचे आयोजन संत नामदेव नगर मध्ये करण्यात आले असून त्याच वेळी,श्री कृष्णा महाराज रामदासी यांच्या दर्शनाचा लाभ होणार आहे, कथेचे आयोजन दररोज दुपारी दोन ते पाच वेळेत केले आहे,सर्वांनी याचा लाभ घ्यावा असेश्री.रुक्मिणीकांत कृपा सांप्रदायिक वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्री प्रभाकरराव कुलकर्णी, नूतन विद्यमान अध्यक्ष श्री सुरेश जोशी पारगावकर ,उपाध्यक्ष श्री देविदास डोळे, श्री प्रकाश मानुरकर, प्रा.डी.एस. कुलकर्णी, श्री,हरीभाऊ बुगदे ,श्री.बाळासाहेब पारगावकर, श्री मुकुंदराव खडके, श्री.कमलाकर मालेगावकर ,श्री. रामकृष्णपंत जोशी,.श्री आर.डी. देशमुख, .श्री.राहुल कुलकर्णी सुर्डीकर, बाळासाहेब रत्नपारखी, कुमारराव देशमुख, अशोकराव ओपळक र, सुधीर ,राऊतमारे, धनंजय लाखणगाव कर, श्री.अनिल टिकली,श्री किशन राव कुलकर्णी पिंपळवाडी कर,आणि संत नामदेव नगर मधील सर्व महिला पुरुष मंडळी यांनी आवाहन केले आहे.

# परभणी जिल्ह्यात ३० जूनपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू

**परभणी**- दिनांक २१ जून २०२६ रोजी होणारी नीट परीक्षा, १७ ते २६ जूनदरम्यान साजरा होणारा मोहरम, २६ जून रोजी साजरी होणारी छत्रपती संभाजी महाराज जयंतीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था आबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहे. आदेशानुसार दि. ३० जून २०२६ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत परभणी जिल्ह्यात सार्वजनिक ठिकाणी शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडुके, बंदुका, सुरे, काठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येणाऱ्या वस्तू जवळ बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच दाहक पदार्थ, स्फोटके, दगड अथवा इतर क्षेपणास्त्रे बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे यासही बंदी घालण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणी आरडाओरड करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे, व्यक्ती अथवा मृतदेहांच्या प्रतिमा किंवा आकृत्यांचे प्रदर्शन करणे तसेच सभ्यता, नीतिमत्ता किंवा राज्याच्या सुरक्षिततेस बाधा पोहोचेल अशी आवेशपूर्ण भाषणे, अंगविक्षेप, विडंबन अथवा आक्षेपार्ह चित्रे, फलक व चिन्हांचे प्रदर्शन किंवा प्रसार करण्यासही मनाई करण्यात आली आहे. कलम ३७ (३) अन्वये सार्वजनिक ठिकाणी किंवा रस्त्यावर पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र जमणे तसेच मिरवणुका काढण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. मात्र, शासकीय कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय व निमशासकीय कर्मचारी, विवाह समारंभ, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा तसेच सक्षम अधिकाऱ्यांनी विशेष परवानगी दिलेल्या मिरवणुका व कार्यक्रमांना या आदेशातून वगळण्यात आले आहे. मिरवणूक अथवा कार्यक्रमास परवानगी देण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक, परभणी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना राहतील. असे जिल्हादंडाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी जारी केलेल्या आदेशात नमूद करण्यात आले आहेत.

# मंत्रालयीन विभागाचे विभाजन आणि राज्य पोलीस दलाचे आधुनिकीकरण लोकाभीमुख प्रशासन साठी महत्वाचे पाऊल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(मधुसूदन सोनवकळकर/ दै.धर्मयोध्दा)

**मुंबई** - राज्यातील मंत्रालयीन विभागाचे विभाजन करून ३३ असलेल्या विभागा मध्ये १२ नवीन स्वतंत्र विभाग करून एकुण विभागाची संख्या ही ४५ करण्याचा निर्णय कॅबीनेट बैठकीत मंजूर करण्यात आला आहे लोकाभीमुख प्रशासना साठी हा निर्णय महत्वाचा ठरेल असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे असे असतील महत्व पुर्ण बदल १) गृह विभागातून परिवहन हा स्वतंत्र विभाग अस्तित्वात आला आहे २) महसूल विभागातून महसूल वन आणि मदत पुर्णवसन हे स्वतंत्र विभाग असतील ३ ) शालेय शिक्षण व क्रीडा हे स्वत्रंत विभाग राहतील ४) पर्यटन व सांस्कृतिक कार्य



हे स्वतंत्र विभाग असतिल ५) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य आणि अन्न आणि औषधी प्रशासन हे स्वतंत्र विभाग असतील ६) ऊद्योग व खणीकर्म ऊर्जा कामगार विभागाचे विभाजन करून तीन स्वतंत्र विभाग कार्यरत करण्यात आले आहेत ७) नियोजन विभाग अंतर्गत येणारे रोजगार हमी योजना विभाग अता नव्याने मृद व जलसंधारण विभागाशी जोडण्यात आला आहे ८ ) सहकार पणन वस्त्रोऊद्योग हे तीन स्वतंत्र विभाग करण्यात आले आहेत ९ ) कृषी विभागातुन पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग हे तीन स्वतंत्र विभाग असतील १०) सामान्य प्रशासन व राजशिष्टाचार हे दोन स्वतंत्र मंत्रालयीन विभाग असतील वरील प्रमाणे ३३ वरून ४५ मंत्रालयीन विभाग झाल्या मूळे संबंधीत विभागाचे मंत्री सचिव यांचेत पुर्वी काही निर्णय घेतांना लवकर एकमत होत नसे त्या मुळे योजना राबवितांना अडचणी व समस्या निर्मान होत असत अता स्वतंत्र विभाग झाल्यामुळे प्रशासकिय गतीमानता येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केलेआहे पोलीस विभागाचे ही होणार आधुनिकीकरण... केंद्र शासनाने राज्याच्या पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्यास मंजूरी दिली असून या साठी केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी सुमारे ७३३ कोटी रुपये चा निधी महाराष्ट्रा साठी दिला आहे या माध्यमातुन सागरी सुरक्षा ड्रग्ज विषयक सुधारणा सायबर सुरक्षा सह आधुनिक शस्त्रे वाहने पोलीस विभागाला ऊपलब्ध करून दिली जाणार आहेत पोलीस विभागाकडे केवळ मनुष्यबळ असून चालणार नाही तर तांत्रिक सुधारणासह पोलीस विभागाला आधुनिक बनवण्यासाठीचे केंद्र व राज्य शासना चे धोरण असल्याचे राज्याचे मुख्य मंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगीतले तसेच पोलीस सुधारणा करण्यास केंद्रीय गृह मंत्री अमित शाहा यांनी दिलेल्या योगदानाबद्दल मुख्यमंत्र्यांनी त्यांचे आभार ही मानले आहेत .

# प्रा. शेख एम. एम. यांचा महाविद्यालयात सत्कार



(दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)

**मानवत**- येथील के. के. महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाच्या पर्यवेक्षकपदी प्रा. शेख एम. एम. यांची नियुक्ती झाल्याबद्दल महाविद्यालयात त्यांचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला.

यावेळी प्राचार्य डॉ. भास्कर मुंडे, उपप्राचार्य डॉ. के. जी. हुगे,स्टाफ सेक्रेटरी डॉ. पंडित मोरे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सत्कार समारंभात उपस्थित मान्यवरांनी प्रा. शेख एम. एम. यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. भास्कर मुंडे यांनी पर्यवेक्षक पदाची जबाबदारी, कार्यपद्धती, प्रभावी नियोजन, संवाद कौशल्य आणि प्रशासकीय कामकाजाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच प्रा. शेख यांच्याकडून कनिष्ठ विभागाच्या शैक्षणिक गुणवत्तावृद्धीसाठी मोलाचे योगदान मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी अनेक प्राध्यापकांनी मनोगत व्यक्त करून प्रा. शेख एम. एम. यांना शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना प्रा. शेख एम. एम. यांनी महाविद्यालय प्रशासनाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली व सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. पंडित मोरे यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao